# BDC LIBRARY

## News Paper Clipping

## A.Y. 2025-26

दैनिक
एकमेव विश्वासाचा
महाराष्ट्र न्यूज

January 4, 2026
Page no:3 | epaper.mahanewsnet.com

# छ. शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय किर्तीचे सेनानी : डॉ. विनायक राऊत

* महाराष्ट्र न्यूज नेटवर्क

पाटण, दि. ३ जानेवारी : छत्रपती शिवाजी महाराज हे खरोखरच आंतरराष्ट्रीय कीर्तीचे सेनानी आणि दूरदृष्टीचे राजे होते, ज्यांनी गनिमी कावा, नौदल आणि कुशल नेतृत्वाच्या जोरावर एक मजबूत साम्राज्य उभे केले आणि त्यांच्या शौर्याची, नेतृत्वाची आणि न्यायी शासनाची चर्चा जगभर आहे, ज्याचे उदाहरण म्हणून परदेशी इतिहासकारांनीही त्यांचे कौतुक केले आहे. त्यांनी केवळ युद्ध जिंकले नाहीत, तर हिंदवी स्वराज्य स्थापन करून स्वराज्य, स्वाभिमान आणि एक आदर्श राज्याची संकल्पना जगासमोर ठेवली, ज्यामुळे ते आजही प्रेरणास्थान आहेत, असे मत बा. दे. कॉलेजचे प्रा. डॉ. विनायक राऊत यांनी व्यक्त केले.

ते बाळासाहेब देसाई महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विशेष श्रम संस्कार शिबिरामध्ये प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. यावेळी अध्यक्ष म्हणून प्रा.डॉ. आर. जी. कांबळे उपस्थित होते. तर प्रमुख वक्ते म्हणून प्रा. डॉ. प्रशांत फडणीस उपस्थित होते. प्रमुख उपस्थितीत गणपत कदम, जगन्नाथ मगर सदस्य ग्रामपंचायत ढोरोशी, महाविद्यालयाचे एन.एस.एस.शिबीर संचालक व कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. एल. जी. गणगे व बजरंग चव्हाण तसेच विजय गुरव हे होते.



डॉ. राऊत पुढे म्हणाले की, शिवाजी महाराजांच्या जीवनानंतरही त्यांचे शौर्य आणि रणनीतीची नोंद परदेशी वृत्तपत्रांमध्ये झाली, जिथे त्यांना शिवाजी, द किंग ऑफ इंडिया म्हटले गेले. छत्रपती शिवाजी महाराज हे केवळ भारतातीलच नव्हे, तर जागतिक इतिहासातील एक महान सेनानी आणि राष्ट्रनिर्माते म्हणून ओळखले जातात. तसेच शिबिरात सहभाग घेतल्यास विद्यार्थ्यांच्या हातून देशाची व समाजाची सेवा घडून येईल व समर्थ व आत्मनिर्भर भारताचे स्वप्न पूर्ण होईल असे मत त्यांनी व्यक्त केले.

प्रमुख वक्ते डॉ. फडणीस यांनी आपल्या मनोगतात जाहिराती आणि आजचा युवक या विषयावर मार्गदर्शन केले. ते म्हणाले की, युवकांनी फसव्या जाहिरातींच्या मागे लागू नये. जाहिरातीमधून अनावश्यक उत्पादने आपल्यावर लादली जातात. प्रभावी जाहिरात तंत्र ग्राहकांच्या मनावर अधिराज्य गाजविते आणि आपण त्याला बळी पडतो. खरेदी करताना जागृतपणे करावी. श्रमसंस्कार शिबिराच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या विविध कला गुणांना वाव मिळतो. तसेच त्यांच्या नैतिक मूल्यांचा विकास होतो युवकांचे राष्ट्र निर्मितीत महत्वाचे योगदान असून श्रमदानाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी केलेले काम आनंद देणारे असते असे मत व्यक्त केले.

अध्यक्षीय भाषणात डॉ. आर. जी. कांबळे म्हणाले की, एन.एस.एस. हे आपणास श्रमाचा आनंद घ्यायला शिकवते. या विशेष श्रमसंस्कार शिबीरामध्ये सात दिवस वेगवेगळ्या विषयावर तज्ञ लोकांचे मार्गदर्शन होत असून विद्यार्थी तर आहेतच परंतु ग्रामस्थांनी सुद्धा याचा लाभ घ्यावा. ग्रामस्थांच्या सहकार्यातून राबवलेले उपक्रम व महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी केलेले श्रम हे गावासाठी महत्त्वाचे ठरतील असे सांगितले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक राहुल कदम तर आभार प्रदर्शन राहुल भूजळे या विद्यार्थ्याने केले आणि सूत्रसंचालन दर्शना शिर्के या विद्यार्थीनीने केले. या कार्यक्रमाच्यावेळी प्रा.डॉ. भरत जाधव, प्रा. विशाल कांबळे, प्रा. रमेश शिर्के, प्रा. सुरेश संकपाळ, ढोरोशी ग्रामपंचायत सदस्य, व राष्ट्रीय सेवा योजनेतील स्वयंसेवक उपस्थित होते.